वित्तीय वर्ष २०१७-१८ च्या वित्तीय विवरणपत्रातील प्रदेशनिहाय संवितरणाकरिता, विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश, २०११ मधील नियम ७ अन्वये महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी दिलेले निदेश.

प्रास्ताविक

१. भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) अन्वये भारताच्या राष्ट्रपतींनी केलेल्या " महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४" याद्वारे विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळांच्या क्षेत्रांच्या संबंधात संविधानाच्या अनुच्छेद ३७१ चा खंड (२) उपखंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या बाबींसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांवर विशेष जबाबदारी सोपवली आहे. दिनांक ५ सप्टेंबर, २०११ रोजी, महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी " विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकास मंडळे आदेश २०११" (यात या पुढे ज्याचा उल्लेख "आदेश" असा करण्यात आला आहे) काढला व त्याद्वारे उक्त तीन प्रदेशांसाठी स्वतंत्र विकास मंडळे गठित केली.

२. उक्त आदेशाच्या नियम ७ अनुसार, एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजांचा विचार करुन, विकास मंडळांच्या क्षेत्रांवरील विकास खर्चासाठी निधींचे समन्याय्यतेने नियतवाटप होत असल्याची खात्री करुन घेणे, ही महाराष्ट्राचे राज्यपाल यांची विशेष जबाबदारी आहे.

३. उक्त आदेशाच्या नियम ८ अनुसार, राज्यपाल यांनी केलेले निधींचे किंवा नियतव्ययांचे नियत वाटप, राज्य विधानमंडळापुढे ठेवावयाच्या वार्षिक

वित्तीय विवरणपत्रात (पुरवणी अर्थसंकल्पासह) दर्शविण्यात येईल आणि उपरोक्तपणे नियतव्ययांच्या संबंधातील विकास कार्ये, राज्य शासन पार पाडील किंवा पार पाडावयास लावील आणि असे नियतवाटप केलेले निधी हे, एका मंडळाकडून दुस-या मंडळाकडे न वळवता येण्याजोगे असतील. आणखी, नियम ८ नुसार राज्य शासन, सर्व क्षेत्रांकरिताच्या विकास खर्चासाठी प्रदेशनिहाय व प्रवर्गनिहाय नियतव्यय व खर्च यांचे विवरणपत्र देखील तयार करील. या विवरणपत्रामध्ये मागील वित्तीय वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरित रकमा व सुधारित खर्च यांचा तसेच, मागील वित्तीय वर्षाच्या अगोदरच्या वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरित रकमा व प्रत्यक्ष खर्च यांचा तपशील दिलेला असेल.

४. उक्त आदेशाच्या नियम १० नुसार प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पुरेशा सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पुरेशा संधी उपलब्ध करुन देण्यासाठी समन्यायी व्यवस्था केली जाईल याची राज्यपाल खातरजमा करतील.

## योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे पुनर्वर्गीकरण

५. केंद्र शासनाने घेतलेला निर्णय विचारात घेऊन राज्य शासनाने सर्वकष मार्गदर्शक तत्वे दिनांक २७ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे निर्गमित केली आहेत. सदर शासन निर्णयानुसार अर्थसंकल्पीय खर्च आता "(अ)*अनिवार्य खर्च*" आणि "(ब) *कार्यक्रमांवरील खर्च*" यांमध्ये वर्गीकृत करण्यात येणार आहे.

६. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठीचे निदेश देतांना दिनांक २७ जानेवारी २०१७ च्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आलेले पुनर्वर्गीकरण विचारात घेण्यात आले

आहेत. त्यामुळे, निदेशांतर्गत देण्यात येणारी नियतवाटपाची तत्वे पूर्वीच्या योजनांतर्गत - योजनेतर तत्वांवर आधारित नसून नवीन वर्गीकरणाच्या तत्वांवर आधारित आहेत.

## सिंचन क्षेत्रातील अनुशेषाची विद्यमान स्थिती

७. निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचन क्षेत्रातील (०१.०४.१९९४ रोजीच्या) प्रदेशनिहाय अनुशेषाचे मूल्यमापन केले होते (जोडपत्र-१). सिंचन क्षेत्रातील ०१.०४.१९९४ रोजीचा वित्तीय अनुशेष **₹** ७४१८ कोटी होता. वर्ष २००० मध्ये त्याची पुनर्गणना प्रचलित मापदंड विचारात घेऊन **₹** ६६१८.३७ कोटी इतकी सुधारीत करण्यात आली होती. सन २००१ पासून हा अनुशेष भरुन काढण्याच्या मुख्य उद्देशाने राज्यपाल निदेश देत आले आहेत. मार्च २०११ पर्यंत सर्व जिल्हयांमधील वित्तीय अनुशेष भरुन निघाला आहे. एप्रिल १९९४ रोजी असलेल्या निव्वळ पेरणी क्षेत्राच्या संदर्भात निर्माण केलेल्या सिंचन क्षमतेची रब्बी समतुल्य (रसतु) एककामध्ये राज्य सरासरी ३५.११% होती. अनुशेषांतर्गत जिल्हयांसाठी अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे भौतिक अनुशेष सुद्धा भरुन निघेल असे अपेक्षित होते. मात्र कालापव्यय आणि दर वाढ यांमुळे भौतिक साध्याबाबत अनुरुप कामगिरी झाली नाही.

८. सिंचन अनुशेष राज्यातील बुलढाणा, अकोला, वाशिम आणि अमरावती या चार जिल्हयांमध्ये सध्या अस्तित्वात आहे. २०१०-११ ते २०१४-१५ वर्षांसाठी अनुशेष निर्मूलनाची पंचवार्षिक योजना तयार करुनही, आणि योजना कालबद्धरित्या सुधारित करुनही, जलसंपदा विभाग ४ जिल्हयातील सिंचनाचा भौतिक अनुशेष दूर करु शकला नाही. अद्याप, प्रस्तावित योजनेत विर्निदिष्ट केलेल्या उद्दिष्टां पैकी साध्य अत्यंत कमी झाले आहे. जून २०१६ अखेर उर्वरित भौतिक अनुशेष १,९४,४३२ हेक्टर (रसतु) एवढा होता. (जोडपत्र-२ पहा.) हा अनुशेष निर्मूलन करण्यासाठी, जलसंपदा विभागाने २०१५-१६ ते २०१८-१९ या चार वर्षांसाठीचा सुधारित अनुशेष निर्मूलन

कार्यक्रम सादर केला आहे. (जोडपत्र- ३ पहा.) राज्यपाल यांनी अपेक्षा व्यक्त केली आहे की, अनुशेष निर्मूलन कार्यक्रमांतर्गत वर्ष निहाय सिंचन क्षमता निर्माण करण्याचे उद्‌दिष्ट पाळले जाईल.

## आर्थिक वर्ष २०१७-१८ च्या सिंचन क्षेत्रासाठीच्या *कार्यक्रमांवरील खर्चाचे* नियतवाटप

९. वित्त विभागाने दिनांक ७ मार्च, २०१७ रोजीच्या पत्राद्वारे असे दर्शविले आहे की, आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये जलसंपदा विभागाकरिता *कार्यक्रमांवरील खर्चा*साठी **₹** ८२३३.६७ कोटी इतके एकूण नियतवाटप उपलब्ध करुन देण्यात आले आहे.

क) यापैकी, **₹** ९१०.२२ कोटी इतकी रक्कम पूर नियंत्रण, खार जमिनी, जलविद्युत प्रकल्प, लाभक्षेत्र विकास, महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार कार्यक्रम, सामाईक योजना (जल विज्ञान प्रकल्प, यांत्रिकीकरण व गुणवत्ता नियंत्रण इ) आणि आर्थिक वर्ष २०१०-११ साठीच्या निदेशातील परिच्छेद २२ नुसार घ्यावयाच्या प्रकल्पांचा शेल्फ निर्माण करणे, वन जमिनीच्या हस्तांतरणासाठीचे नक्त प्रत्याक्षी मूल्य (NPV), जलविज्ञान प्रकल्प टप्पा तीन, आणि भूसंपादन कायदयातील तरतूदी अंतर्गत लोकअदालत अथवा मा. न्यायालयाच्या आदेशानुसार भूसंपादन आणि पुनर्वसन यातील अडचणी मिटविणे यासारख्या योजनांसाठी राखून ठेवण्याचे प्रस्तावित आहे.या प्रकारची देयके दिल्यामुळे मंडळ निहाय खर्चामध्ये काही असमतोल निर्माण झाल्यास यापुढील निदेशांमध्ये तो समायोजित करण्यात येईल.

ख) राज्यपाल यांनी, राज्यशासनाच्या शिफारशीनुसार, ५ आंतरराज्य प्रकल्प आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पांसाठी पुरेसा निधी प्राथम्याने मिळण्याच्या

दृष्टीने हे प्रकल्प निदेशांच्या कक्षेबाहेर ठेवण्यास संमती दिली आहे. आंतरराज्य प्रकल्पांसाठी ₹ १०० कोटी आणि गोसीखुर्द राष्ट्रीय प्रकल्पासाठी ₹ ७५० कोटी इतके नियतवाटप प्रस्तावित करण्यात आले आहे.

ग) मराठवाडा प्रदेशातील उस्मानाबाद आणि बीड जिल्हयातील दुष्काळ प्रवणता आणि तीव्र पाणी टंचाई लक्षात घेऊन राज्य शासनाने कृष्णा मराठवाडा पाटबंधारे प्रकल्पाला विशेष दर्जा देण्यासंदर्भात विचाराधीन असल्याबाबत कळविले आहे. सदर प्रकल्प कालमर्यादेत पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार येत्या अर्थसंकल्पामध्ये या प्रकल्पासाठी ₹ २५०.०० कोटी उपलब्ध करुन देण्याचे जलसंपदा विभागाने प्रस्तावित केले आहे. तसेच, सदर ₹ २५० कोटी निदेशांच्या बाहेर ठेवण्याबाबत विनंती केली आहे. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी राज्यपाल यांनी ही विनंती स्वीकृत केली आहे.

घ) उपरोक्त निर्देशित (क),(ख) आणि (ग) मधील निधी निदेशांच्या बाहेर ठेवण्यात येऊन उर्वरित ₹ ६२२३.४५ कोटी इतके विभाज्य नियतवाटप जलसंपदा क्षेत्रासाठी कार्यक्रमांवरील खर्चासाठी उपलब्ध असेल. आदिवासी घटकासाठीचे ₹ ५०.०० कोटीचे नियतवाटप परिच्छेद १० मध्ये स्वतंत्ररित्या दर्शविण्यात आले आहे.

१०. शासनाने दर्शविलेली निधीची उपलब्धता, अनुशेष निर्मूलनाच्या ४ वर्षांच्या योजनेप्रमाणे लागणारा आवश्यक निधी, आणि एकूण राज्याच्या म्हणून असलेल्या गरजा लक्षात घेऊन, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, सिंचन क्षेत्राकरिता कार्यक्रमांतर्गत खर्चासाठीचे नियतवाटप खालील प्रमाणे आरक्षित करण्यात यावे:-

(i) सिंचन क्षेत्रासाठी एकूण नियतवाटपाच्या विभाज्य तरतूदीमधून, ज्या जिल्हयांचा भौतिक अनुशेष शिल्लक आहे, त्या अमरावती विभागातील ४ जिल्हयांसाठी

पुरेसा निधी प्रथम राखून ठेवण्यात येईल. अनुशेष निर्मूलनासाठी निश्चित केलेल्या प्रकल्पांची कामाची प्रगती लक्षात घेऊन राज्यपालांचे असे मत आहे की, या ४ जिल्हयांसाठी ₹ १००० कोटी इतकी अतिरिक्त तरतूद करण्यात यावी.

(ii) वर स्पष्ट केल्याप्रमाणे अनुशेष दूर करण्याकरिता आवश्यक निधी राखून ठेवल्यानंतर, राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, तीन प्रदेशांमध्ये विभाज्य नियतव्ययाचे वाटप त्या प्रदेशांची लोकसंख्या आणि निव्वळ पेरणी क्षेत्र यातील प्रत्येक घटकाच्या सम भारांकाच्या आधारे करावे. तीन प्रदेशासाठी निधीच्या हिश्श्याची टक्केवारी जोडपत्र-६ अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

(iii) दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ मधील परिच्छेद ८ (iii) नुसार, आर्थिक वर्ष २०१२-२०१३ पर्यंतच्या खर्चाच्या आधिक्य/तुटीच्या प्रदेशनिहाय दुरुस्त्या अंमलात आणण्यात आल्या आहेत. दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ च्या निदेशात दर्शविल्याप्रमाणे या दुरुस्त्या आर्थिक वर्ष २०१४-१५,२०१५-१६ आणि २०१६-१७ या तीन वर्षात समान टप्प्यात करण्यात आल्या होत्या. आता आर्थिक वर्ष २०१३-१४, आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी खर्चातील आधिक्य/तुटी काढणे आवश्यक आहे.आर्थिक वर्ष २०१३-१४, आर्थिक वर्ष २०१४-१५ आणि आर्थिक वर्ष २०१५-१६ चे खर्चातील तुटी आणि आधिक्यचे तपशील आणि या खर्चातील तुटी आणि आधिक्य बाबत तीनही प्रदेशांसाठी आवश्यक दुरुस्त्या याबाबत जोडपत्र ५ अ ते जोडपत्र ५ क यामध्ये दर्शविण्यात आले आहे. या दुरुस्त्या जलसंपदा विभागाने कळविलेल्या खर्चाच्या आकडेवारी आधारे करण्यात आल्या आहेत. तथापि, राज्यपाल यांनी असे लक्षात घेतले आहे की, या सर्व दुरुस्त्या वर्तमान आर्थिक वर्षात करणे योग्य होणार नाही. म्हणून राज्यपाल यांनी असे निदेशित केले आहे की, या आर्थिक वर्षे २०१३-१४ ते २०१५-१६ च्या आधिक्यच्या खर्चाच्या दुरुस्त्या आर्थिक वर्ष २०१७-१८, आर्थिक वर्ष २०१८-१९ आणि आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये समान टप्प्यात समायोजित करण्यात याव्यात. हे समायोजन जोडपत्र ५ ड मध्ये दर्शविण्यात आले आहे.

(iv) जोडपत्र ७ अ मध्ये अनुशेष दूर करण्यासाठी लागणारा नियतव्यय, प्रदेशनिहाय लोकसंख्या आणि निव्वल पेरणी क्षेत्र यांचे प्रमाणाच्या आधारे उर्वरित नियतव्यय आणि आर्थिक वर्ष २०१७-१८ साठीच्या प्रदेश निहाय दुरुस्त्या यासाठीचा आवश्यक निधी यानुसार विभाज्य निधीचे प्रदेश निहाय नियतवाटप दर्शविण्यात आले आहे.

(v) राज्यपाल यांनी, राज्यशासनाच्या शिफारशीनुसार उर्वरित महाराष्ट्र प्रदेशातील प्रधान मंत्री कृषी सिंचाई योजना (PMKSY) अंतर्गत प्रकल्पांसाठी वार्षिक योजना २०१६-१७ मध्ये, पुढील निदेशातील नियतवाटपाच्या तत्वांनुसार इतर प्रदेशांना नुकसान भरुन देण्याच्या अटीच्या अधिन राहून **₹** ३००.०० कोटीचे नियतवाटप निदेशाच्या बाहेर ठेवण्यास परवानगी दिली होती. विभागाने वर्ष २०१७-१८ मध्ये उर्वरित महाराष्ट्रासाठीच्या अंतिम नियतवाटपातून वरील निधीचे फेर वाटप होईल याची खात्री करावी. (पहा जोडपत्र ७ अ)

(vi) राज्यपाल यांनी असे निदेशीत केले आहे की, जरी नक्त प्रत्याक्षी मुल्य (NPV) आणि इतर बाबी यांची गरज अविभाज्य नियतव्ययातून भागविण्यात येत असली तरी, प्रथमतः गरजेनुसार विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील उपलब्ध निधीतून हा खर्च भागविण्यात यावा आणि त्या नंतर समायोजित करावा.

(vii) राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधीचे प्रदेश निहाय वितरण त्या त्या प्रदेशाची आदिवासी लोकसंख्या आणि आदिवासी उपयोजनेखालील* क्षेत्रफळ यांना प्रत्येकी ५० टक्के भारांक देवून करण्यात यावे. जनगणना २०११ नुसार आदिवासी लोकसंख्या यासाठी उपयोगात आणण्यात आली आहे. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधीची तीन प्रदेशांसाठी हिश्यांची टक्केवारी जोडपत्र ६ ब मध्ये दर्शविण्यात आली आहे.

(viii) आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत नियतव्यय ₹ ५० कोटी आहे. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधीचे नियतवाटप जोडपत्र ७ ब मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे करावे.

(ix) त्यामुळे, सिंचन क्षेत्रासाठी विभाज्य नियतव्ययाचे प्रदेशनिहाय अंतिम नियतवाटप खालील तक्ता १ मध्ये दिल्याप्रमाणे असेल.

तक्ता १. आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी सिंचन क्षेत्राचे विभाज्य नियतव्ययाचे प्रदेश निहाय अंतिम नियतवाटप .

(₹ कोटी)

| प्रदेश | *कार्यक्रमांवरील* खर्चातील उर्वरित विभाज्य निधीचे नियतवाटप (जोडपत्र ७ अ पहावे) | आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत निधीचे नियतवाटप (जोडपत्र-७ ब पहावे) | एकूण नियतवाटप |
|---|---|---|---|
| विदर्भ | २०८४.७९ | २१.०४ | २१०५.८३ |
| मराठवाडा | १३०९.६७ | २.६९ | १३१२.३६ |
| उर्वरित महाराष्ट्र | २८२८.९९ | २६.२७ | २८५५.२६ |
| एकूण | ६२२३.४५ | ५०.०० | ६२७३.४५ |

*(जरी आदिवासी उपयोजनेचे पुनर्वर्गीकरण करण्यात आले असले तरी पूर्वीच्या संदर्भानुसार आदिवासी उप योजना खालील क्षेत्र गृहीत धरण्यात आले आहे.)

११. अनुशेष असलेल्या अमरावती, अकोला, वाशिम आणि बुलढाणा या जिल्हयांचा अनुशेष दूर करण्यासाठी राखून ठेवलेले परिच्छेद १० (i) मधील नियतवाटप हे, उर्वरित विभाज्य नियतव्ययातून या जिल्हयांसाठी जलसंपदा विभागाने

उपलब्ध करुन दिलेल्या नियतवाटपाच्या अतिरिक्त असेल. अनुशेष आणि उर्वरित विभाज्य नियतव्यय यांच्या उपलब्ध झालेल्या एकत्रित नियतवाटपातून या जिल्हयांमधील चालू कामांसाठी, अनुशेष दूर करण्यासाठी अग्रक्रम ठरविलेल्या प्रकल्पांच्या कामांसह, लागणा-या निधीची पूर्तता होईल, अशी अपेक्षा आहे.

१२. आणखी, राज्य शासनाने, सिंचन क्षेत्रासाठी अर्थसंकल्पाशिवाय बाजारातून कर्जे घेण्याचा मार्ग अवलंबल्यास, अशा प्रकारे उभारलेला पैसा हा, संपूर्ण राज्यासाठी असावा आणि वर दर्शविल्याप्रमाणे, तीन विकास मंडळांमध्ये वरील परिच्छेद १०(ii) मध्ये दर्शविल्याप्रमाणे समन्यायतेने विभागण्यात यावा. आणखी असे की, या निदेशामध्ये अंतर्भूत असलेल्या नियतवाटपांशिवाय, सिंचन क्षेत्रासाठी पुरवणी मागण्यांद्वारे अतिरिक्त तरतूद उपलब्ध झाल्यास त्यांचे संवितरण जोडपत्र-६ अ मध्ये स्पष्ट केलेल्या प्रमाणानुसार या तीन विकास मंडळांच्या क्षेत्रामध्ये करण्यात येईल.

१३. जलसंपदा विभागाने असा प्रस्ताव सादर केला होता की, आधीच्या वर्षांमध्ये शिल्लक असलेला अखर्चित निधी गृहित धरुन, २०१५-१६ मध्ये अमरावती विभागातील ४ जिल्हयातील प्रकल्पांसाठी असलेले नियतवाटप खर्च होणे शक्य नसल्यामुळे, यवतमाळ जिल्हयातील बेंबळा, निम्न वर्धा आणि बावनथडी आंतरराज्य प्रकल्प या ३ प्रकल्पांवर अमरावती विभागातील ४ जिल्हयांसाठी असलेल्या तरतुदीमधून समायोजन करण्यात यावे. या प्रस्तावास मान्यता देतांना, राज्यपाल यांनी असे निदेश दिले की, हा समायोजित केलेला निधी विदर्भ प्रदेशांतर्गत असलेल्या तरतुदींमधून अमरावती विभागात ४ अनुशेष जिल्हयांसाठी आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये समायोजित करण्यात यावा. जलसंपदा विभागानी कळविले होते की, आर्थिक वर्ष २०१५-१६ मध्ये ₹ १८५ कोटी बेंबळा (₹१०० कोटी), निम्न वर्धा (₹६५ कोटी) आणि बावनथडी (₹२० कोटी) या प्रकल्पांसाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते. यानुसार,

जलसंपदा विभागाने दिनांक २३ फेब्रुवारी २०१७ च्या पत्रान्वये सादर केले आहे की, विदर्भ प्रदेशातील अनुशेष नसलेल्या जिल्हयांसाठी उपलब्ध केलेल्या निधीतून ₹ १८५ कोटी आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये अनुशेषांतर्गत जिल्हयांसाठी अतिरिक्त स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

१४. प्रधान सचिव (जलसंपदा) यांनी तीनही विभागातील खर्चाचा त्रैमासिक आढावा घ्यावा आणि जशी गरज भासेल तेंव्हा खर्चाबाबतची सूत्रे तंतोतंत जुळण्यासाठी सुधारणेबाबत उपाय योजावेत.

१५. राज्यपाल यांनी अपर मुख्य सचिव (नियोजन), अपर मुख्य सचिव (वित्त), व प्रधान सचिव (जलसंपदा) यांची समिती प्रकल्पनिहाय नियतवाटप अंतिम करील असे कळविले होते. शासनाने दिनांक ४ मार्च २०१७ च्या पत्रान्वये प्रकल्पांना अग्रक्रम, भौतिक/आर्थिक नियोजन आणि अर्थसंकल्पीय तरतुदींच्या पुनर्विनियोजनाचे अधिकार प्रधान सचिव (जलसंपदा) यांना प्रदान करण्याबाबत राज्यपाल यांना विनंती केली आहे. राज्यपाल यांनी प्रस्तावास मान्यता दिली आहे. तथापि, राज्यपाल यांनी असे निदेशित केले आहे की, प्रकल्पनिहाय निधीचे वाटप करतांना यासाठी स्पष्ट निकष असावेत ज्यामध्ये पूर्णत्वाच्या मार्गावर असलेल्या प्रकल्पांना अग्रक्रम देता येईल. तसेच भूसंपादन, पुनर्वसन, नक्त प्रत्याक्षी मूल्य आणि इतर मान्यता या साठी अग्रक्रम देता येईल. कोणताही निधी एका प्रदेशातून दुस-या प्रदेशाकडे तसेच अनुशेष असलेल्या जिल्हयातून बिगर अनुशेष जिल्हयाकडे वळविता येणार नाही. राज्यपाल यांनी असेही निदेश दिले आहेत की, जर निधींचे पुनर्विनियोजन करावे लागल्यास, त्याची सविस्तर कारणे नमूद करावीत.

१६. राज्यपाल यांचे असे निदर्शनास आले की, भारत सरकारकडून निधी वितरणासाठी विलंब होत असल्यामुळे अनुशेषांतर्गत ४ जिल्हयांतील वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमाच्या (AIBP) प्रकल्पांच्या अंमलबजावणीच्या वेगावर

विपरित परिणाम होतो. म्हणून, राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, या चार जिल्हयांमध्ये, वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमाच्या केंद्रीय निधीच्या वितरणामध्ये पडलेला खंड भरुन काढण्यासाठी योग्य ती उपाय योजना करावी आणि दरम्यान केंद्रीय हिस्सा प्राप्त करुन घ्यावा. ४ जिल्हयातील वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रमात समाविष्ट प्रकल्पांना केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार राज्य हिश्याचा निधी जून २०१६ मध्ये वितरित केला आहे. केंद्र शासनाचा हिस्सा प्राप्त करुन घेण्यासाठी सर्व प्रस्ताव सादर करण्यात आले आहेत आणि केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

१७. तीनही प्रदेशामध्ये चालू असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेला निधी जोडपत्र-४ मध्ये दर्शविण्यात आला आहे. चालू प्रकल्पांवरील शिल्लक किंमत आणि तसेच साधन संपत्ती "पसरली" जाण्यातील धोके लक्षात घेता, राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, जोपर्यंत राज्य शासन चालू प्रकल्पांवरील निधीच्या उपलब्धतेवर परिणाम न होऊ देता निश्चित कालमर्यादेत प्रकल्प पूर्ण होण्याच्या दृष्टीने पुरेसा अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देत नाही, तोपर्यंत नवीन प्रकल्पांचे काम हाती घेण्यात येवू नये. हे उत्तरदायित्व लक्षात येता, हे निदेश सुरुच राहतील.

१८. विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाकडील मोठया प्रमाणावर रिक्त पदांबाबत राज्यपाल यांना अवगत करुन देण्यात आले आहे. रिक्त पदांचा अनिष्ट परिणाम अनुशेषांतर्गत जिल्हयातील चालू प्रकल्पांच्या प्रगतीवर होत आहे. म्हणून, दि. १० मार्च २०१५ च्या निदेशातील परिच्छेद १८ मध्ये राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, राज्य शासन इतर प्रदेशातून बदली, नवीन भरती, पदोन्नती, इत्यादी मार्गाने चार अनुशेषांतर्गत जिल्हयातील सध्या असलेली रिक्त पदे भरेल. जलसंपदा विभागाच्या अद्ययावत अहवालानुसार अमरावती विभागाअंतर्गत गट अ च्या एकूण १६७ पदांपैकी

२२ पदे (१३.१७ टक्के) आणि गट ब च्या ५४३ पदापैकी १०४ पदे (१९.१५ टक्के) रिक्त आहेत. राज्यपाल यांचे निदर्शनास आले आहे की, ४ अनुशेषांतर्गत जिल्हयांमध्ये मोठया प्रमाणावरील रिक्त पदे असणे हे निधी कमी खर्च होण्याच्या इतर कारणांपैकी एक कारण आहे. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, हे निदेश निर्गमित झाल्यानंतर ४ महिन्यांत ४ अनुशेषांतर्गत जिल्हयातील रिक्त पदे निश्चित भरण्यात यावीत.

## सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेषाची स्थिती

१९. दिनांक १ एप्रिल, १९९४ रोजी निर्देशांक व अनुशेष समितीने सिंचनक्षेत्र वगळता अन्य सर्व क्षेत्रांमधील परिगणना केलेला एकंदरीत अनुशेष हा, ₹६५८८.७७ कोटी (जोडपत्र-१) इतका होता. वित्तीय वर्ष १९९५-९६ पासून ३१ मार्च २०१६ पर्यंतचा अनुशेष दूर करण्यावरील झालेला खर्च वजा केल्यानंतर सिंचनाव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांतील अनुशेष ₹ ३०८.८२ कोटी गणना करण्यात आला आहे (जोडपत्र-८). वित्तीय अनुशेष फक्त सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये अस्तित्वात आहे.

## ऊर्जाक्षेत्रः कृषी पंपसंचाना वीज पुरवठा करणे

२०. ऊर्जा विभागाने कळविल्यानुसार ३१ मार्च २०१६ रोजीच्या कृषी पंप विद्युतीकरणाचा शिल्लक अनुशेष १४६०९ होता.

२१. विभागाने ठाणे, रत्नागिरी, चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्यांमध्ये २०१६-१७ मध्ये कृषी पपांच्या अनुशेषाचे निर्मुलन करण्याचे उद्दिष्ट प्रस्तावित केले होते. तथापि वर्ष २०१६-१७ मध्ये ३१ डिसेंबर २०१६ पर्यंतचे भौतिक साध्य फक्त ४५८० आहे. २०१६-१७ मध्ये चंद्रपूर जिल्हयातील भौतिक अनुशेषाचे निर्मूलन झाले आहे.

२२. दिनांक १ फेब्रुवारी २०१७ च्या पत्रान्वये प्रधान सचिव (ऊर्जा) यांनी रत्नागिरी (८१५६ पंप) आणि गडचिरोली (१७५९ पंप) वगळता सर्व

जिल्हयातील उर्वरित भौतिक अनुशेषाचे मार्च २०१५ पर्यंत निर्मूलन होईल असे कळविले आहे. २०१७-१८ मध्ये विभागाने रत्नागिरी जिल्हयातील २४०० कृषी पंप आणि गडचिरोली जिल्हयातील १७५९ कृषी पंपाच्या विद्युतीकरणाची उद्दिदष्टे प्रस्तावित केली आहे. या साठी विभागाने ₹ ८७.३० कोटीची मागणी केली आहे त्यानुसार आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये या योजनेसाठी प्रदेशनिहाय नियतव्ययाचे विवरण जोडपत्र ९ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

उच्च व तंत्र शिक्षणः तंत्र निकेतन

२३. दिनांक २४ जानेवारी २०१७ च्या पत्रान्वये, प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) यांनी सादर केले आहे की, तंत्र निकेतन उपक्षेत्रांतर्गत निर्देशांक व अनुशेष समितीने गणना केलेला २८१८ विदयार्थी जागांचा भौतिक अनुशेष १ एप्रिल १९९९ ते मार्च २०१३ या कालावधीत टप्याटप्याने संपूर्णतः निर्मूलन करण्यात आला आहे. पत्रासोबत विदयार्थी जागांच्या अनुशेष निर्मूलनाचा वर्ष निहाय आणि जिल्हा निहाय माहितीचा तपशीलही सादर करण्यात आला आहे. अनुशेष योजने अंतर्गत निधी आता संस्थात्मक अनुशेष निर्मूलनासाठी देण्यात येत आहे. योजने अंतर्गत २२ तंत्रनिकेतन इमारतींची बांधकामे घेण्यात आली, त्यापैकी १५ बांधकामे पूर्ण झाली होती. २०१६-१७ मध्ये विभागाने कळविले होते की, ८ कामे प्रगतीपथावर आहेत आणि २ कामे सुधारित अंदाजांच्या मान्यतेस्तव प्रलंबित आहेत. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये विभागाने यासाठी ₹३२.७६ कोटींची मागणी केली होती. आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये विभागाने शासकिय तंत्रनिकेतन विक्रमगड आणि शासकिय तंत्रनिकेतन गोंदिया येथील कर्मशाळा, मुलांचे वस्तीगृह आणि अनुशेष निर्मूलन कार्यक्रमातंर्गत घेण्यात आलेली चार शासकिय तंत्रनिकेतन महाविदयालये, उर्वरित महाराष्ट्रातील विक्रमगड आणि नंदूरबार, मराठवाडयातील हिंगोली, विदर्भातील गोंदिया, येथील आस्थापना खर्चासाठी ₹२५.८५ कोटींची मागणी प्रस्तावित केली आहे.

## कौशल्य विकास आणि उद्योजकताः औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तंत्र माध्यमिक शाळा

२४. तंत्र माध्यमिक शाळा उपक्षेत्रामध्ये, मुंबई शहर (३०९ जागा) आणि मुंबई उपनगर जिल्हा (२४० जागा) असा एकूण ५४९ विदयार्थी जागांचा अनुशेष शिल्लक आहे. विभागाने मुंबई आणि मुंबई उपनगर जिल्हयातील तंत्र माध्यमिक शाळांमध्ये १५ नवीन पदे निर्माण करण्याबाबत वित्त विभागाकडे प्रस्तावित केले होते. राज्यपाल यांनी यासाठी तात्काळ कारवाई करण्याचे निदेशित केले आहे ज्यामुळे या उपक्षेत्रातील अनुशेष लवकरात लवकर दूर होऊ शकेल. विभागाने आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये मालेगाव (नाशिक), कामठी (नागपूर) आणि खेड (रत्नागिरी) येथील तंत्र माध्यमिक शाळांच्या इमारत बांधकामासाठी ₹२ कोटीची मागणी प्रस्तावित केली होती. विभागाने सादर केले आहे की, मालेगाव (नाशिक) येथील इमारत बांधकाम पूर्ण झाले असून सार्वजनिक बांधकाम विभागाकडून इमारत ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरु आहे. विभागाने आणखी असेही सादर केले आहे की, कामठी आणि खेड येथील माध्यमिक शाळांसाठी भूसंपादनाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. दिनांक २० जानेवारी २०१७ च्या पत्रान्वये विभागाने तंत्र माध्यमिक शाळा कामठी (₹०.५० कोटी) आणि तंत्र माध्यमिक शाळा खेड (₹१.५० कोटी) येथील बांधकामासाठी अनुशेष योजनेखालील २०१७-१८ च्या कार्यक्रमांवरील खर्चाअंतर्गत ₹२.०० कोटींची मागणी केली आहे.

२५. औदयोगिक प्रशिक्षण संस्था उपक्षेत्रामध्ये विभागाने वर्ष २०१६-१७ मध्ये लोअर परेल (जिल्हा मुंबई), सेलू (जिल्हा परभणी) आणि कामठी (जिल्हा नागपूर) येथील चालू बांधकामे पूर्ण करण्यासाठी ₹ ७ कोटींची मागणी प्रस्तावित केली होती. तथापी २०१६-१७ मध्ये योजनेखाली काहीही खर्च झाला नाही. विभागाने आता औदयोगिक प्रशिक्षण संस्था लोअर परेल (जिल्हा

मुंबई), सेलू (जिल्हा परभणी) आणि कामठी (जिल्हा नागपूर) येथील चालू बांधकामे पूर्ण करण्यासाठी ₹ ७ कोटींची मागणी प्रस्तावित केली आहे. राज्यपाल यांचे निदेशानुसारचे आर्थिक वर्ष २०१७-१८ साठीचे प्रदेशनिहाय व उपक्षेत्रनिहाय नियतवाटप जोडपत्र-९ मध्ये दर्शविण्यात आले आहे.

सार्वजनिक आरोग्य सेवा

२६. दिनांक १ एप्रिल, २००० रोजी सार्वजनिक आरोग्य क्षेत्रामध्ये ₹ १३५३.६७ कोटी वित्तीय अनुशेष होता. ३१ मार्च २०१६ पर्यंतचा खर्च विचारात घेता, या क्षेत्रामध्ये ₹ ३०८.८२ कोटी चा वित्तीय अनुशेष अदयाप शिल्लक आहे. राज्यपाल यांनी चिंता व्यक्त केली आहे की, गेल्या ५-६ वर्षामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाला अनुशेष निर्मूलनासाठी नियतवाटप केलेल्या निधीपैकी पुरेसा निधी खर्च करणेही शक्य झाले नाही. आर्थिक वर्ष २०१६-१७ मध्ये सुद्धा सार्वजनिक आरोग्य क्षेत्राचा, एकूण ₹ १०१.८५ कोटी तरतुदी पैकी, डिसेंबर २०१६ अखेरचा खर्च ₹ २०.८६ कोटी एवढाच आहे. राज्यपाल यांनी सार्वजनिक आरोग्य हे वित्तीय अनुशेष शिल्लक असलेले एकमेव क्षेत्र असल्याबद्दल काळजी व्यक्त केली आहे. म्हणून, राज्यपाल यांनी पुनःश्च असे निदेशित केले आहे की, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य यांनी अनुशेष निर्मूलन कार्यक्रमातंर्गत २०१७-१८ साठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तरतुदी निश्चितपणे खर्च होतील याबाबत सविस्तर कार्यक्रम तयार करावा. हा कृती कार्यक्रम हे निदेश निर्गमित झाल्यापासून दोन महिन्या पर्यंत राज्यपाल यांचे अवलोकनार्थ सादर करावा.

२७. राज्यपाल यांनी, विभागाने केलेल्या विनंतीनुसार वित्तीय वर्ष २०१७-१८ करिता ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रे, रुग्णवाहिका, उपकरणे व इतर साधनसामग्री आणि फर्निचर या करीता, ₹ १२४.५३ कोटी ठेवण्याबाबत निदेश दिले आहेत. हे नियतवाटप जोडपत्र-९ मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

## सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी नियतवाटप

२८. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, २०१७–१८ च्या कार्यक्रमावरील खर्चामध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी ₹ २४६.६८ कोटी इतक्या रकमेचे नियतवाटप राखून ठेवण्यात यावे. सन २०१७–१८ या वर्षात अनुशेष दूर करण्यासाठी या नियतव्ययाचे प्रदेशनिहाय नियतवाटप खालील तक्ता २ प्रमाणे करण्यात यावे.

तक्ता २. २०१७–१८ साठी सिंचन क्षेत्रव्यतिरीक्त अन्य क्षेत्रांचे विभाज्य नियतव्ययाचे प्रदेश निहाय अंतिम नियतवाटप.

| अ. क्र. | प्रदेश | अनुशेष निर्मूलनासाठी नियतव्यय (₹ कोटीत) (जोडपत्र ९) | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | विदर्भ | ६५.६९ | २६.६३% |
| २ | मराठवाडा | २६.६६ | १०.८१% |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | १५४.३३ | ६२.५६% |
| ४ | एकूण | २४६.६८ | **१००.००%** |

२९. प्रदेशांतर्गत अनुशेष दूर करण्यासाठीचे क्षेत्र–निहाय नियतवाटप जोडपत्र ९ मध्ये दर्शविलेले आहे. राज्यपाल यांनी निदेशित केले आहे की, सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष निर्मूलनासाठीचे नियतवाटप काटेकोरपणे निदेशानुसार आणि त्या विभागाच्या नियमित कार्यक्रमांवरील खर्चाच्या नियतव्ययापेक्षा जास्तीचे असावे.

*कार्यक्रमांवरील खर्चाच्या* उर्वरित निधीच्या वाटपाची तत्वे

३०. सिंचन क्षेत्रासाठी असलेले नियत वाटप आणि अनुशेष असलेल्या इतर क्षेत्रांमधील अनुशेष दूर करण्यासाठी असलेला निधी वजा केल्यानंतर, *कार्यक्रमांवरील खर्चा*च्या उर्वरित नियतव्ययाचा विभाज्य भाग, तीन प्रदेशांमध्ये त्या त्या प्रदेशाच्या एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात संवितरित करण्यात यावा. असे करतांना जनगणना २०११ ची आकडेवारी विचारात घ्यावी. कार्यक्रमावरील खर्चाच्या उर्वरित नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय नियतवाटपात, त्या क्षेत्रामधील त्या त्या प्रदेशांच्या गरजा व विकासाच्या संधी यांचा विचार करुन, त्या तीन प्रदेशांमध्ये क्षेत्रनिहाय वितरण करण्याची लवचिकता असेल. तथापि प्रदेशाची सर्व क्षेत्रीय नियतव्ययाची एकूण रक्कम ही कार्यक्रमावरील खर्चाच्या उर्वरित नियतव्ययातील त्या प्रदेशाच्या हिश्श्याच्या एकूण कमाल मर्यादेच्या अधीन राहील.

३१. राज्यपाल यांची अशी इच्छा आहे की, आर्थिक वर्ष २०१७-१८ हे संक्रमण वर्ष असल्यामुळे, परिच्छेद ३० मध्ये निर्देशित केल्याप्रमाणे नियतव्यय वाटपाचे तत्व *कार्यक्रमांवरील खर्चासाठी* लागू होईल. तथापि, राज्यपाल यांची अशी इच्छा आहे की वित्त विभागाने *अनिवार्य खर्चातील* विकासात्मक भागाचा तपशील ही काढावा, त्या योगे तो तपशील आगामी निदेशांपसून नियतव्यय वाटपाची तत्वे ठरवितांना गृहित धरता येऊ शकेल. वित्त विभागाने अनिवार्य खर्चातील विकासात्मक खर्चाच्या भागाचा तपशील राज्यपाल यांच्या अवलोकनार्थ १ जून २०१७ पर्यंत न चुकता सादर करावा.

विकास मंडळे

३२. प्रत्येक विकास मंडळांनी कमीत कमी दोन जिल्हयांचा जिल्हा विकास अहवाल तयार करावा हे निदेश दिनांक १७ मार्च, २०१२ च्या निदेशाप्रमाणे चालू

राहतील. जिल्हयांची निवड करतांना विकास मंडळांनी मानव विकास निर्देशांक कमी असलेल्या जिल्हयांना प्राधान्य दयावे. आणखी, विकास मंडळांच्या उद्देशानुसार मंडळे इतर अभ्यासही घेऊ शकतात. वरील जबाबदा-या पार पाडण्यासाठी राज्यपालांनी प्रत्येक विकास मंडळासाठी ₹२ कोटी राखून ठेवावेत असे निदेश दिले आहेत. त्यानुसार मंडळांच्या आवश्यकतेनुसार त्यांना निधी उपलब्ध करुन दयावा.

## प्रदेशनिहाय विकासाचा समतोल यावरील तज्ज्ञ समिती

३३. *महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीने* आपला अहवाल ऑक्टोबर २०१३ मध्ये राज्यपाल यांना सादर केला आहे. राज्यपाल यांनी या अहवालाबाबत राज्य शासनाचे मत मागविले आहे. उच्च स्तरीय समितीच्या शिफारशी स्वीकारण्या संदर्भात शासन निर्णय दिनांक १७ जानेवारी २०१५ नुसार मंत्रिमंडळ उप समिती गठित करण्यात आली आहे. राज्यपाल यांची अशी अपेक्षा आहे की, राज्य शासन हा अहवाल, समितीच्या शिफारशी, नियतवाटपांची तत्वे यांसह विचारार्थ घेईल आणि यावरील आपली मते तातडीने राज्यपाल यांच्या विचारार्थ सादर करेल.

## अनुच्छेद ३७१ (२) (ग) नुसार राज्यपालांची विशेष जबाबदारी

३४. संविधानाच्या अनुच्छेद ३७१(२) (ग) आणि विकास मंडळे आदेश २०११ च्या खंड १० नुसार, राज्यपाल यांना प्रत्येक विकास मंडळ क्षेत्राअंतर्गत तंत्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यांसाठी पर्याप्त सुविधा आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करणारी समन्याय व्यवस्था करण्याबाबतची विशेष जबाबदारी आहे.

३५. दिनांक १५ फेब्रुवारी २०१४ च्या निदेशातील परिच्छेद ३१ नुसार, राज्यपालांनी विकास मंडळ क्षेत्र निहाय तंत्रशिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण यासाठीच्या पुरेशा सुविधा आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या संधी याबाबतच्या सद्‌यस्थितीचा आढावा घेण्याची इच्छा व्यक्त केली होती. राज्यपाल यांनी उच्च व तंत्रशिक्षण विभागाने गेल्या तीन शैक्षणिक वर्षासाठीची तंत्र शिक्षण व व्यवसाय प्रशिक्षण देणा-या राज्य आणि केंद्र शासन तसेच अनुदानित व विनाअनुदानित खाजगी संस्थाकडील विद्‌यार्थी प्रवेश क्षमता आणि विद्‌यार्थी प्रवेशांचे क्षेत्र-निहाय प्रतिनिधीत्व याबाबतची माहिती सादर करण्याचे निदेश दिले होते. शासनाने शैक्षणिक वर्ष २०१५-१६ मधील व्यावसायीक तंत्र पदवीपूर्व पाठयक्रमांसाठी प्रवेश घेतलेल्या विद्‌यार्थ्यांची माहिती सादर केली होती. राज्यपाल यांनी दिनांक ११ मार्च २०१६ च्या निदेशात असे निदेश दिले होते की, शासनाने अशा पाठयक्रमांसाठी प्रवेश घेणा-या विद्‌यार्थ्यांच्या प्रदेशनिहाय प्रमाणात तफावती संदर्भात मार्ग सुचविण्यासाठी समिती गठित करावी. ही समिती विविध प्रदेशात स्थापन झालेल्या उच्च व तंत्र शिक्षण संस्थांच्या संख्येतील प्रादेशिक असंतुलनाचा अभ्यास करील आणि प्रादेशिक असंतुलन सुधारण्याबाबत उपाय सुचवेल. राज्यपाल यांनी शासकिय परिपत्रक दिनांक २० जानेवारी २०१७ नुसार संचालक, तंत्रशिक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली असल्याचे लक्षात घेतले आहे.सदर समिती या उपायांबाबतचा अहवाल हे निदेश निर्गमित झाल्यापासून ६ महिन्यात सादर करील अशी अपेक्षा राज्यपाल यांनी व्यक्त केली आहे.

३६. राज्यपाल यांनी सामान्य प्रशासन विभागाला राज्यशासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये क्षेत्रनिहाय प्रतिनिधित्वाबाबतची आकडेवारी सादर करण्याबाबतही निदेशित केले होते. स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त संस्था आणि सरकार पुरस्कृत महामंडळे या बाबतची महितीही यासाठी विचारात घ्यावयाची होती. राज्यपाल यांनी लक्षात घेतले आहे की, दिनांक १५ ऑक्टोबर २०१५ च्या

शासन निर्णयाद्वारे वित्त मंत्री यांचे अध्यक्षतेखाली याबाबत मंत्रिमंडळ उपसमिती गठित करण्यात आली आहे. राज्यपाल यांचे असे निदेश आहेत की, उप समितीचा अहवाल लवकरात लवकर सादर करण्यात यावा.

## निदेशांचे अनुपालन

३७. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम, २००५ चे कलम २१ (१) व (२) मधील तरतुदींनुसार, राज्यपालांच्या निदेशानुसार अनुशेष निर्मूलनाची विशेष जबाबदारी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्रधिकरणावर आहे. राज्यपाल यांनी अमरावती विभागातील चार जिल्हयातील सिंचन अनुशेष निर्मूलनाबाबत राज्यपालांच्या निदेशांच्या अंमलबजावणीवर संनियंत्रणाची जबाबदारी, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाकडे सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने अनुशेष असलेल्या जिल्हयातील सिंचन क्षेत्राशी संबंधित निदेशांच्या अंमलबजावणीबाबत विशेषकरुन सुधारित प्रशासकीय मान्यता, पुर्नविनियोजनाचे अधिकार, पुरेशा कर्मचारी वर्गाची उपलब्धता, भूसंपादन आणि पुनर्वसन या बाबींचा नियतकालिक आढावा घ्यावा. महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने निदेशांच्या अंमलबजावणीबाबत पूर्तता अहवाल, काही शिफारसी असल्यास त्यांसह, राज्यपालांना तिमाही सादर करावा.

३८. राज्यपाल यांनी त्यांच्या दि. १० मार्च २०११ च्या निदेशामध्ये सिंचन क्षेत्रासह सर्व क्षेत्रांचे प्रदेशनिहाय नियतव्यय आणि खर्चाबाबत तपशीलवार माहिती संकलित करण्याची कार्यप्रणाली विकसित करण्याबाबत आदेशित केले होते. राज्यपाल यांनी निदेशित केले होते की, नियोजन विभागाने आर्थिक वर्ष २०१०-११ पासूनची प्रदेश निहाय योजनाअंतर्गत खर्चाची आकडेवारी प्रसिद्‌ध करावी आणि प्रदेशांतर्गत आधिक्य किंवा निधी वळविणे यांचे प्रमाण दर्शवावे. या निदेशांच्या अनुपालनाअंतर्गत, नियोजन विभागाने आर्थिक वर्ष २०१४-१५ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वर्ष २०१२-१३ ची, तर आर्थिक

वर्ष २०१५-१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात वर्ष २०१३-१४ ची माहिती सादर केली आहे. नियोजन विभागाने आता सादर केले आहे की, आर्थिक वर्ष २०१०-११, २०११-१२ आणि २०१४-१५ ची संकलित माहिती २०१६ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात सादर झाली असून विभागाच्या संकेतस्थळावर टाकण्यात आली आहे. राज्यपाल यांनी प्रदेश निहाय योजनांतर्गत खर्चाची आर्थिक वर्ष २०१५-१६ ची संकलित माहिती प्रसिध्द करावी असे निदेश दिले आहेत.

३९. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ३७१ च्या खंड (२) चे उपखंड (ख) आणि आदेशातील नियम ७ नुसार योजनेतर विकास खर्चाचे प्रदेश निहाय समन्यायी वाटप देखील राज्यपाल यांच्या कार्यकक्षेत येत असल्यामुळे, राज्यपाल यांनी वित्त विभागाला योजनेतर खर्चाची आकडेवारीसुध्दा प्रसिध्द करण्याविषयी दि. १७ मार्च २०१२ च्या निदेशामध्ये निदेश दिले होते. हे निदेश १३ मार्च २०१३, १५ फेब्रुवारी २०१४ आणि १० मार्च २०१५ च्या निदेशांमध्ये पुनश्च देण्यात आले होते. वित्त विभागाने आर्थिक वर्षे २०११-१२ आणि २०१२-१३ साठीची प्रदेश निहाय खर्च (योजनेतर) ची माहिती सादर केली आहे. तथापि, आर्थिक वर्ष २०१३-१४ व त्यापुढील वर्षाची प्रदेश निहाय योजनेतर विकास खर्चाची माहिती सादर झालेली नाही. गत वर्षीचे प्रदेश निहाय योजनांतर्गत आणि योजनेतर खर्चाचे संकलन जुलै २०१७ पर्यंत करण्यात यावे असे निदेश आहेत.

४०. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, प्रदेशनिहाय *कार्यक्रमांवरील खर्चाची* आकडेवारी दरवर्षी लवकरात लवकर प्रकाशित करावी. राज्यपाल यांनी असेही निदेशीत केले आहे की, ही आकडेवारी "ऑन लाईन" ठेवण्यात यावी.

४१. दिनांक १३ मार्च २०१३ च्या निदेशातील परिच्छेद ३७ नुसार, नियोजन विभागाने अर्थसंकल्प पत्रकांतील अविभाज्य खर्चाची बाब निहाय पुनर्तपासणी करावी आणि शक्य असेल तिथे त्या त्या प्रदेशांसाठी खर्च दर्शवावा असे राज्यपाल यांनी निदेशीत केले होते. दि. १० मार्च २०१५ च्या परिच्छेद ३९ मध्ये राज्यपाल यांनी पुनःश्च असे निदेशीत केले आहे की, बाब निहाय खर्चाचे वर्गीकरण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करावेत ज्यायोगे कोणतीही विभाज्य बाब चुकीने अविभाज्य बाब म्हणून गणली जाणार नाही याची खात्री होईल. दिनांक ११ मार्च २०१६ च्या परिच्छेद ४४ मध्येही अशाच प्रकारचे निदेश देण्यात आले होते. सदर वर्गीकरणाबाबतचा तपशील जुलै २०१६ पर्यंत राज्यपालांना सादर करावा असे राज्यपाल यांचे निदेश होते.तथापि, या निदेशांचे अद्याप पालन झालेले नाही. वार्षिक वित्तीय विवरणपत्रातील वर्गीकरणामधील वदल विचारात घेता वित्त विभागाला असे निदेश देण्यात येत आहेत की, *कार्यक्रमांवरील खर्चातील* अविभाज्य घटक शक्यतो कमीत कमी ठेवण्यात यावा आणि योग्य पद्धतीने वर्गीकृत करावा.

४२. राज्यपाल यांनी असे निदेश दिले होते की, विभागीय आयुक्त यांनी त्यांच्या विभागातील अनुशेष निर्मूलना संदर्भातील सर्व बाबींचा त्रैमासिक आढावा घ्यावा व अनुशेष निर्मूलना अंतर्गत कामातील प्रगतीबाबत लक्ष ठेवावे.

४३. राज्यपाल यांनी असे निदेश दिले आहेत की, मुख्य सचिवांनी चालू तसेच पूर्वीच्या निदेशातील अनुपालनांचा आढावा घ्यावा आणि धोरणात्मक मुद्दे असल्यास त्यांचे शासनस्तरावर योग्य निराकरण करावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(बी.वेणुगोपाल रेड्डी)
राज्यपालांचे सचिव

राजभवन, मुंबई.
दिनांक : ११ मार्च, २०१७.

## जोडपत्र - १

### निर्देशांक व अनुशेष समितीने गणना केल्यानुसार (दिनांक १ एप्रिल, १९९४ रोजी असल्याप्रमाणे) प्रदेशनिहाय वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र ( ₹ कोटीत)

| अनुक्रमांक | प्रदेश | सिंचन | इतर अनुशेष क्षेत्र | एकूण अनुशेष |
|---|---|---|---|---|
| १ | विदर्भ | ४०८३.००<br>(५५.०४%) | २५४१.०२<br>(३८.५७%) | ६६२४.०२<br>(४७.६०%) |
| २ | मराठवाडा | २४०१.००<br>(३२.३७%) | १६०३.५५<br>(२४.३४%) | ४००४.५५<br>(२८.७७%) |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | ९३४.००<br>(१२.५९%) | २४४४.२०<br>(३७.०९%) | ३३७८.२०<br>(२३.६३%) |
| ४ | एकूण | **७४१८.००**<br>**(१००%)** | **६५८८.७७**<br>**(१००%)** | **१४००६.७७**<br>**(१००%)** |

आधार : निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल.

## जोडपत्र - २

## जून २००८ पासून अमरावती विभागातील उर्वरित भौतिक अनुशेष (सिंचन क्षेत्र)

**जून २००७ चा अनुशेष - ३,३८,०७० हेक्टर**

| | उर्वरित अनुशेष (हेक्टर रसतु मध्ये) | मागील वर्षात दूर झालेला अनुशेष (हेक्टर रसतु मध्ये) |
|---|---|---|
| जून २००८ | २,९१,३७० | ४६,७०० |
| जून २००९ | २,६३,४५३ | २७,९१७ |
| जून २०१० | २,५७,५१८ | ५,९३५ |
| जून २०११ | २,४७,९४८ | ९,५७० |
| जून २०१२ | २,३४,०१९ | १३,९२९ |
| जून २०१३ | २,२७,२६९ | ६,७५० |
| जून २०१४ | २,२३,७०५ | ३,५६४ |
| जून २०१५ | २,१४,२६९ | ९,४३६ |
| जून २०१६ | १,९४,४३२ | १९,८३७ |

**आधार : जलसंपदा विभाग आणि महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे अहवाल**

**जोडपत्र - ३**

**सुधारित भौतिक अनुशेष निर्मूलन कार्यक्रम (सिंचन क्षेत्र) ***

(हेक्टर रसतु)

| जिल्हा | १ जुलै २०१५ रोजीचा शिल्लक सिंचन अनुशेष | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|
| **1** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** |
| १. अमरावती | ७७१०५ | ८३०८ | २६७०२ | २९०२६ | १९८५० | ८३८८६ |
| २. अकोला | ४७५१६ | २१८९ | २७४० | ३८५६९ | ७६६३ | ५११६१ |
| ३. वाशिम | २८४३१ | ९४९१ | १८४५४ | ३७१४ | ७७३ | ३२४३२ |
| ४. बुलढाणा | ६१२१७ | ७४०० | १०२६६ | ५०४८ | ४१०५६ | ६३७७० |
| **एकूण विभाग** | **२१४२६९** | **२७३८८** | **५८१६२** | **७६३५७** | **६९३४२** | **२३१२४९** |

* **जलसंपदा विभागाने दिनांक २६ ऑक्टोबर २०१५ रोजीच्या महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाची आढावा बैठक आणि मा.राज्यपाल यांनी बोलविलेल्या दिनांक ३ नोव्हेंबर २०१५ रोजीच्या सभेमध्ये सादर केल्यानुसार**

# जोडपत्र - ४

## चालू सिंचन प्रकल्पांची शिल्लक किंमत

| **अनुक्रमांक** | **प्रदेश** | **दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजीची प्रकल्प संख्या** | **दिनांक १ एप्रिल, २०१६ रोजीची शिल्लक किंमत (₹ कोटीत) @** |
|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** |
| १ | विदर्भ | १५७ | ३३५८६.७९ |
| २ | मराठवाडा | ६७ | १४८२४.३२ |
| ३ | उर्वरित महाराष्ट्र | १५२ | ३६०१८.३० |
| | **एकूण** | **३७६** | **८४४२९.४१** |

@ तात्पुरती किंमत
आधार: जलसंपदा विभाग

**जोडपत्र - ५ अ**

**आर्थिक वर्ष २०१३-१४ मधील प्रदेशनिहाय खर्च (₹ कोटीत)**

| प्रदेश | जलसंपदा विभागाने कळविलेला खर्च | गोसीखुर्द आणि आंतरराज्य प्रकल्पावरील खर्च | जलसंपदा विभागाने कळविलेली खर्चातील इतर विपथने | स्तंभ ३ आणि विपथनासाठी खर्चात केलेल्या दुरुस्त्या = स्तंभ २ - स्तंभ ३ - स्तंभ ४ |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| विदर्भ | **३३२९.३१** | **७८२.९९** | | **२५४६.३२** |
| मराठवाडा | **१३५४.०७** | **६०.६१** | **१०१.८४** | **११९१.६२** |
| उर्वरित महाराष्ट्र | **३१००.९२** | **४०.६३** | **३३.४६** | **३०२६.८३** |
| एकूण | **७७८४.३०** | **८८४.२३** | **१३५.३०** | **६७६४.७७** |

## दुरुस्त्या

| प्रदेश | २०१३-१४ च्या निदेशातील नियतव्यय सुत्रे | २०१३-१४ च्या निदेशातील दुरुस्त्या | २०१३-१४ च्या निदेशात अनुशेष निर्मूलनासाठी राखून ठेवलेला निधी | खर्च (वरील स्तंभ ५ पहा) | नियतव्यय सुत्रानुसार उपलब्ध निधी नुसार खर्च =स्तंभ ५ – स्तंभ ३ – स्तंभ ४ | विभागनिहाय खर्चाचे प्रमाण = स्तंभ ६ / एकूण (स्तंभ ६)*१०० | नियतव्यय सुत्रानुसार खर्चातील फरक = स्तंभ ७ – स्तंभ २ | खर्चातील अधिक्य/तूट =स्तंभ ८*एकूण (स्तंभ ६)/१०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| विदर्भ | २५.६५% | ० | ७५०.०० | २५४६.३२ | १७९६.३२ | २९.८७% | ४.२२% | २५३.५३ |
| मराठवाडा | २२.५४% | ० | ० | ११९१.६२ | ११९१.६२ | १९.८१% | -२.७३% | -१६४.१० |
| उर्वरित महाराष्ट्र | ५१.८१% | ० | ० | ३०२६.८३ | ३०२६.८३ | ५०.३२% | -१.४९% | -८९.४२ |
| एकूण | १००.००% | ० | ७५०.०० | ६७६४.७७ | ६०१४.७७ | १००.००% | | |

**जोडपत्र ५ ब**

**आर्थिक वर्ष २०१४-१५ मधील प्रदेशनिहाय खर्च (₹ कोटीत)**

| प्रदेश | जलसंपदा विभागाने कळविलेला खर्च | गोसीखुर्द आणि आंतरराज्य प्रकल्पावरील खर्च | जलसंपदा विभागाने कळविलेली खर्चातील इतर विपथने | स्तंभ ३ आणि विपथनासाठी खर्चात केलेल्या दुरुस्त्या = स्तंभ २ - स्तंभ ३ - स्तंभ ४ |
|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** |
| विदर्भ | **२५३०.३०** | **३१७.३१** | | **२२१२.९९** |
| मराठवाडा | **१०३२.१३** | **२७.७१** | **४६.९५** | **९५७.४७** |
| उर्वरित महाराष्ट्र | **२३५५.३७** | **१५.०७** | **३३.१८** | **२३०७.१२** |
| एकूण | **५९१७.८०** | **३६०.०९** | **८०.१३** | **५४७७.५८** |

## दुरुस्त्या

| प्रदेश | २०१४-१५ च्या निदेशातील नियतव्यय सुत्रे | २०१४-१५ च्या निदेशातील दुरुस्त्या | २०१४-१५ च्या निदेशात अनुशेष निर्मूलनासाठी राखून ठेवलेला निधी | खर्च (वरील स्तंभ ५ पहा) | नियतव्यय सुत्रानुसार उपलब्ध निधी नुसार खर्च = स्तंभ ५ – स्तंभ ३ – स्तंभ ४ | विभागनिहाय खर्चाचे प्रमाण = स्तंभ ६ / एकूण (स्तंभ ६)*१०० | नियतव्यय सुत्रानुसार खर्चातील फरक = स्तंभ ७ – स्तंभ. २ | खर्चातील अधिक्य/तूट = स्तंभ ८ *एकूण (स्तंभ ६)/१०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| विदर्भ | २५.६५% | ४६७.४१ | ७५०.०० | २२१२.९९ | ९९५.५८ | २१.०६% | -४.५९% | -२१७.०४ |
| मराठवाडा | २२.५४% | -७७.१५ | ० | ९५७.४७ | १०३४.६२ | २१.८८% | -०.६६% | -३०.९८ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५१.८१% | -३९०.२६ | ० | २३०७.१२ | २६९७.३८ | ५७.०६% | ५.२५% | २४८.०२ |
| एकूण | १००.००% | ० | ७५०.०० | ५४७७.५८ | ४७२७.५८ | १००.००% | | |

# जोडपत्र ५ क

## आर्थिक वर्ष २०१५-१६ मधील प्रदेशनिहाय खर्च (₹ कोटीत)

| प्रदेश | जलसंपदा विभागाने कळविलेला खर्च | कुऱ्हा वडोदा, बोदवड आणि उर्ध्व पैनगंगा साठी वर्ष २०१३ ते २०१६ मधील खर्चातील आधिक्य / तुटी | गोसीखुर्द आणि आंतरराज्य प्रकल्पावरील खर्च | जलसंपदा विभागाने कळविलेली खर्चातील इतर विपथने | स्तंभ ३ आणि विपथनासाठी खर्चात केलेल्या दुरुस्त्या = स्तंभ ३ - स्तंभ ४ - स्तंभ ५ |
|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| विदर्भ | **४३७३.६९** | **१६.६६** | **६४१.४९** | | **३७१५.५४** |
| मराठवाडा | **१०७७.९६** | **-९.३२** | **२१.४८** | **९.४६** | **१०५६.३४** |
| उर्वरित महाराष्ट्र | **२२२१.३९** | **-७.३४** | **२५.३३** | **५१.११** | **२१५२.२९** |
| एकूण | **७६७३.०४** | **०** | **६८८.३०** | **६०.५७** | **६९२४.१७** |

## दुरुस्त्या

| प्रदेश | २०१५-१६ च्या निदेशातील नियतव्यय सुत्रे | २०१५-१६ च्या निदेशातील दुरुस्त्या | २०१५-१६ च्या निदेशात अनुशेष निर्मूलनासाठी राखून ठेवलेला निधी | खर्च (वरील स्तंभ ६ पहा) | नियतव्यय सुत्रानुसार उपलब्ध निधी नुसार खर्च = स्तंभ ५ — स्तंभ ३ — स्तंभ ४ | विभागनिहाय खर्चाचे प्रमाण = स्तंभ ६ / एकूण (स्तंभ ६)*१०० | नियतव्यय सुत्रानुसार खर्चातील फरक = स्तंभ ७— स्तंभ २ | खर्चातील अधिक्य/तूट = स्तंभ ८*एकूण (स्तंभ ६)/१०० |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** | **७** | **८** | **९** |
| विदर्भ | २५.६५% | ४६७.४१ | १०००.०० | ३७१५.५४ | २२४८.१३ | ३७.९५% | १२.३०% | ७२८.५७ |
| मराठवाडा | २२.५४% | -७७.१५ | ० | १०५६.३४ | ११३३.४९ | १९.१३% | -३.४१% | -२०१.८२ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५१.८१% | -३९०.२६ | ० | २१५२.२९ | २५४२.५५ | ४२.९२% | -८.८९% | -५२६.७६ |
| एकूण | १००.००% | ० | १०००.०० | ६९२४.१७ | ५९२४.१७ | १००.००% | | |

# जोडपत्र ५ ड

## आर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ मध्ये प्रदेशनिहाय करण्यात येणाऱ्या खर्चाचे आधिक्य / तुटीबाबत दुरुस्तीचे संकलित स्वरुपातील विवरणपत्र

( ₹ कोटीत)

| प्रदेश | आर्थिक वर्षासाठी करावयाच्या दुरुस्त्या | | | | आर्थिक वर्षात करावयाच्या दुरुस्त्या | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | Total | २०१७-१८ | २०१८-१९ | २०१९-२० |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | जोडपत्र ५ अ स्तंभ ९ पहा | जोडपत्र ५ ब स्तंभ ९ पहा | जोडपत्र ५ क स्तंभ ९ पहा | = स्तंभ २+ स्तंभ ३ + स्तंभ ४ | = स्तंभ ५/३ | = स्तंभ ५/३ | = स्तंभ ५/३ |
| विदर्भ | २५३.५३ | -२१७.०४ | ७२८.५७ | ७६५.०६ | २५५.०२ | २५५.०२ | २५५.०२ |
| मराठवाडा | -१६४.१० | -३०.९८ | -२०१.८२ | -३९६.९० | -१३२.३० | -१३२.३० | -१३२.३० |
| उर्वरित महाराष्ट्र | -८९.४२ | २४८.०२ | -५२६.७६ | -३६८.१६ | -१२२.७२ | -१२२.७२ | -१२२.७२ |

**तळटीप:**

१. उणे (-) चिन्ह प्रदेशाला निधी उपलब्ध करण्याबाबत दर्शविते.
२. अधिक (+) चिन्ह प्रदेशातून निधी काढून घेण्याबाबत दर्शविते.

## जोडपत्र - ६ अ

## *कार्यक्रमावरील खर्च* २०१७-१८ मधील सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र

| विभाग | लोकसंख्या * (२०११ जनगणना) | लोकसंख्येची टक्केवारी | निव्वळ पेरलेले क्षेत्र (००० हेक्टर) # | निव्वळ पेरलेल्या क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २३००३१७९ | २३.०३% | ५१०६.८ | २८.२७% | २५.६५% |
| मराठवाडा | १८७२७७४८ | १८.७५% | ४७५५.९ | २६.३३% | २२.५४% |
| उर्वरित महाराष्ट्र | ५८१६३५९८ | ५८.२३% | ८१९९.३ | ४५.४०% | ५१.८१% |
| **एकूण** | ९९८९४५२५ | १००.००% | १८०६२.० | १००.००% | १००.००% |

*आधार - जनगणना **२०११**

# आधार - निर्देशांक व अनुशेष समिती अहवाल खंड एक

**जोडपत्र - ६ ब**

**कार्यक्रमावरील खर्च अंतर्गत आदिवासी घटक कार्यक्रम - सिंचन क्षेत्रातील नियतव्ययाच्या नियत वाटपाची तत्वे दर्शविणारे विवरणपत्र**

| प्रदेश | आदिवासी लोकसंख्या | लोकसंख्येची टक्केवारी | जनजाती उपयोजनेखालील क्षेत्र (चौ.कि.मी.) | जनजाती उपयोजनेखालील क्षेत्राची टक्केवारी | लोकसंख्या आणि क्षेत्र यांचा भार (समान) |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | २९१८७३७ | २८.१२% | ३११०१ | ५६.०७% | ४२.०९% |
| मराठवाडा | ७४६०४१ | ७.१९% | १९८३ | ३.५८% | ५.३८% |
| उर्वरित महाराष्ट्र | ६७१५७८२ | ६४.६९% | २२३८२ | ४०.३५% | ५२.५२% |
| **एकूण** | १०३८०५६० | १००.००% | ५५४६६ | १००.००% | १००.००% |

आधार - जनगणना २०११ व आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन

# जोडपत्र -७ अ

**उपलब्ध नियत वाटपातून अनुशेष दूर करणे, उर्वरित निधीचे नियत वाटपाच्या तत्वाधारे करावयाचे संवितरण, आर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ मधील खर्चातील आधिक्य / तुटी दुरुस्ती नुसार तीन प्रदेशांसाठी निधीचे नियत वाटप दर्शविणारे विवरणपत्र वर्ष २०१७-१८** ( ₹ **कोटीत**)

| | |
|---|---|
| सिंचन क्षेत्रासाठी विभाज्य नियतव्यय | ६२२३.४५ @ |
| अनुशेष दूर करण्यासाठी दिलेला नियतव्यय | १०००.०० # |
| नियत वाटप तत्वानुसार नियत वाटपासाठी उपलबध नियतव्यय | ५२२३.४५ |

| प्रदेश | अनुशेष जिल्ह्यांसाठी विशेष नियत वाटप | लोकसंख्या व निव्वळ पेरलेले क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय प्रमाण (सम प्रमाणात) | शिल्लक निधींचे संवितरण स्तंभ ३ मधील प्रमाणानुस ◌ार | आर्थिक वर्ष २०१३-१४ ते २०१५-१६ मधील खर्चातील आधिक्य / तुटीबाबत दुरुस्ती (जोडपत्र **५** ड स्तंभ **६** पहा) | एकूण विभाज्य नियतव्ययाचे वाटप |
|---|---|---|---|---|---|
| विदर्भ | १०००.०० | २५.६५% | १३३९.८१ | -२५५.०२ | २०८४.७९ |
| मराठवाडा | | २२.५४% | ११७७.३७ | १३२.३० | १३०९.६७ |
| उर्वरित महाराष्ट्र | | ५१.८१% | २७०६.२७ | १२२.७२ | २८२८.९९* |
| **एकूण** | **१०००.००** | **१००.००%** | **५२२३.४५** | | **६२२३.४५** |

(वरिल @ परिच्छेद ९(घ) पहा , # परिच्छेद १०(i) पहा, * परिच्छेद १० (v) पहा).

**जोडपत्र- ७ ब**

**आदिवासी लोकसंख्या व आदिवासी उपयोजना क्षेत्र यांच्या भारांकाच्या आधारे आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत जलसंपदा निधीचे संवितरण दर्शविणारे विवरणपत्र वर्ष २०१७-१८** ( ₹ कोटीत)

| | |
|---|---|
| आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत सिंचन क्षेत्रासाठीचा विभाज्य नियतव्यय | ५० |

| प्रदेश | आदिवासी लोकसंख्या आणि आदिवासी उप योजना क्षेत्र यांचे प्रदेशनिहाय भारांक (समान भार) | नियतवाटप |
|---|---|---|
| विदर्भ | ४२.०९% | २१.०४ |
| मराठवाडा | ५.३८% | २.६९ |
| उर्वरित महाराष्ट्र | ५२.५२% | २६.२७ |
| **एकूण** | १००.००% | **५०.००** |

## जोडपत्र - ८

**३१ मार्च २०१६ रोजी असल्याप्रमाणे सार्वजनिक आरोग्य विकास क्षेत्रातील प्रदेशनिहाय उर्वरित वित्तीय अनुशेष दर्शविणारे विवरणपत्र**
**(₹ कोटीत)**

| विदर्भ | | मराठवाडा | | उर्वरित महाराष्ट्र | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अ | ब | अ | ब | अ | ब | अ | ब |
| १८७.३४ | ०.०० | ४२२.७४ | १७९.२८ | ७४३.५९ | १२९.५४ | १३५३.६७ | ३०८.८२ |
| | ०% | | ५८.०५% | | ४१.९५% | | |

**अ:** १/४/२००० रोजी असलेला अनुशेष
**ब:** ३१/३/१६ रोजी असलेला उर्वरित अनुशेष

## जोडपत्र - ९

**वर्ष २०१७-१८ मध्ये सिंचन क्षेत्राव्यतिरिक्त अन्य क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी नियतव्ययाचे क्षेत्र-निहाय नियत वाटप दर्शविणारे विवरणपत्र**

**( ₹ कोटीत)**

| अनुक्रमांक | क्षेत्र | विदर्भ | मराठवाडा | उर्वरित महाराष्ट्र | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| १ | तंत्र शिक्षण | | | | |
| अ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | २.०० | २.०० | ३.०० | ७.०० |
| ब | तंत्रनिकेतन | ५.९६ | ४.१७ | १५.७२ | २५.८५ |
| क | तंत्र माध्यमिक शाळा | ०.५० | ० | १.५० | २.०० |
| २ | सार्वजनिक आरोग्य | १७.९३ | २०.४९ | ८६.११ | १२४.५३ |
| ३ | पंपसंचांचे विद्युतीकरण | ३९.३० | ० | ४८.०० | ८७.३० |
| | एकूण (१+२+३) | ६५.६९ | २६.६६ | १५४.३३ | २४६.६८ |
| | | **२६.६३%** | **१०.८१%** | **६२.५६%** | |

तळटीप : परिच्छेद ३२ मध्ये स्पष्ट केलेल्या प्रयोजनाकरिता वरील नियतवाटपाखेरीज, रुपये २ कोटी इतकी रक्कम प्रत्येक विकास मंडळाकरीता राखून ठेवण्यात येईल